# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 16.06.2025** **वार-सोमवार**

---

**शाळा प्रारंभ**

राज्यात आजपासून नवीन शैक्षणिक वर्षाला प्रारंभ झाला. राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागाच्या वतीनं अनेक शाळांमध्ये शाळा प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. अनेक ठिकाणी मंत्री, लोकप्रतिनिधी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शाळांमध्ये विद्यार्थ्यांचं स्वागत केलं. उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दौंड तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या आलेगाव इथल्या शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांचं पुष्प देऊन स्वागत केलं. भावी पिढी घडवण्यासाठी विद्यार्थ्यांना आधुनिक, दर्जेदार शिक्षण उपलब्ध करुन देण्याबरोबरच सर्व शाळांमध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणं ही राज्य शासनाची नैतिक जबाबदारी आहे. त्यादृष्टीने राज्य शासन शिक्षणावर मोठ्या प्रमाणात खर्च करत आहे, शिक्षकांनीही विद्यार्थ्यांना दर्जेदार ज्ञान देण्याच्यादृष्टीने अध्यापन केलं पाहिजे, असं पवार म्हणाले. यावेळी पवार यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पुस्तकं आणि गणवेशाचं वाटप करण्यात आलं. पुण्यातील बिबवेवाडीतील पुणे महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण माध्यमिक विद्यालयात नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी विद्यार्थ्यांचं स्वागत केलं. तर वानवडी इथल्या महानगरपालिकेच्या शाळा क्रमांक 62 मध्ये जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी आज विद्यार्थ्यांचं पुष्प देऊन स्वागत केलं.

**प्रकाश आबिटकर**

राज्यातील प्रत्येक गरजू रुग्णाला वेळेवर रक्त मिळावं, रक्ताचा तुटवडा निर्माण होऊ नये आणि रक्त वायाही जाऊ नये यासाठी 'नो शॉर्टेज, नो वेस्टेज' हे धोरण अंमलात आणावं असे निर्देश आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज पुण्यात दिले. आरोग्य भवनात झालेल्या राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. उन्हाळ्यात आणि सणासुदीच्या काळात रक्तदान शिबिरांची संख्या घटल्यामुळे रक्ताचा तुटवडा जाणवतो. ही परिस्थिती लक्षात घेऊन राज्यातील सर्व गरजू रुग्णांना वेळेत रक्त उपलब्ध होण्यासाठी नवीन धोरण उपयोगाचं ठरणार असल्याचं आबिटकर यांनी सांगितलं.

**रक्तदातादिन**

14 जून रोजी झालेल्या जागतिक रक्तदाता दिनानिमित्त आकाशवाणी पुणे केंद्रातर्फे आज रक्तदान शिबीराचं आयोजन करण्यात आलं होतं. या शिबीराचं उद्घाटन केंद्राचे उपमहासंचालक अधिर गडपाले यांच्या हस्ते झालं. पूना सिरॉलॉजिकल इन्स्टिटय़ूट ब्लड बॅन्क यांच्या सहकार्याने झालेल्या या रक्तदान शिबिरात 15 जणांनी रक्तदान केलं. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वाय.सी.एम. रुग्णालयाच्या केंद्रानंही शहरात विविध ठिकाणी रक्तदान शिबिर घेतलं. यात 58 रक्तदात्यांनी सहभाग नोंदवला. 'रक्त देऊया, आशा जागवूया : एकत्रितपणे जीव वाचवूया !' ही यंदाच्या जागतिक रक्तदाता दिनाची संकल्पना होती.

**देहू**

जगद्गुरु संत श्री तुकाराम महाराज पालखी प्रस्थान सोहळा अवघ्या चार दिवसांवर आला आहे. त्यानिमित्त भाविकांना सुविधा पुरवण्यासाठी आरोग्य विभागातर्फे चार ठिकाणी बाह्यरुग्ण विभाग सुरू करण्यात आला आहे. त्याबरोबरच गावातील सात खासगी रुग्णालयांतील 10 टक्के खाटा राखीव ठेवण्यात आल्या आहेत, अशी माहिती देहू प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. किशोर यादव आणि डॉ. मेघा पडघने यांनी दिली.

**कृषिमाल**

शेती ही केवळ दोन वेळच्या जेवणाचं साधन न ठेवता त्याकडे यशस्वी उद्योग म्हणून बघावं असं प्रतिपादन कृषी आयुक्त सूरज मांढरे यांनी केलं. सहकार विकास महामंडळातर्फे आयोजित कृषिमाल निर्यात प्रशिक्षणाच्या समारोप कार्यक्रमात ते आज बोलत होते. शेतकऱ्यांनी शेतकरी उत्पादक कंपन्या, सहकारी संस्था, आणि खासगी कंपन्यांच्या माध्यमातून निर्यातक्षम उत्पादन घ्यावं असं आवाहन मांढरे यांनी केलं.

**टपाल**

लोणावळा इथं आजपासून टपाल विभागाच्या महाराष्ट्र आणि गोवा राज्यातील विभाग प्रमुखांची बैठक आयोजित करण्यात आली आहे. महाराष्ट्र आणि गोवा विभागाचे मुख्य पोस्टमास्तर जनरल, अमिताभ सिंह, या बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. या बैठकीदरम्यान विविध विभाग प्रमुखांनी आपापल्या विभागाची उद्दिष्ट आणि ध्येय धोरणे याबाबत सादरीकरण केलं.

**भांडारकर**

आदर्श आणि समर्थ भारताचे निकष काय असावेत? या विषयावर एक राष्ट्रीय पातळीवरील युवाप्रज्ञाशोध निबंध स्पर्धा कौशलम् न्यास, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर, सावरकर स्मारक आणि कॉसमॉस फाउंडेशन यांच्या संयुक्त प्रयत्नातून घेण्यात येत आहे. याकरिता येत्या 30 जून पर्यंत नोंदणी करता येणार असल्याची माहिती कौशलम् न्यासच्या प्रमुख विश्वस्त रोहिणी कुलकर्णी यांनी आज पुण्यात दिली. शालेय विद्यार्थी, महाविद्यालयीन विद्याथी आणि प्रौढ नागरिक अशा तीन श्रेणीत ही स्पर्धा घेण्यात येणार आहे.

**खोखो**

पुरुष आणि महिला गटाची राज्यस्तरीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धा धुळे इथं तर कुमार गटाची स्पर्धा परभणीमध्ये होणार आहे. या स्पर्धेकरता कुमार गटासाठी राखी जोशी तर किशोर गटासाठी धीरज दंडवते या पुण्याच्या प्रशिक्षकांची नेमणूक करण्यात आली. या स्पर्धेत 22 जिल्ह्यातील संघ सहभागी होणार आहेत.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज सकाळपासून मध्यम स्वरूपाचा पाऊस सुरू आहे. उद्याही आकाश ढगाळ राहून हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**